# अनामप्रेम - स्नेहवार्ता



अनामप्रेम - मासिक वृत्तपत्रिका

नोव्हेंबर - 2025

Scanned with OKEN Scanner

# NOVEMBER 2025 HIGHLIGHTS





**अनामप्रेम परिवाराच्या वतीने हरिहर वारकरी शिक्षण संस्था, लिंगतीर्थ ता.नगर जिल्हा अहिल्यानगर येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना थंडीच्या पार्श्वभूमीवर उबदार ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. त्या क्षणी त्यांच्या चेहऱ्यावर फुललेले हास्य आणि डोळ्यांत झळकणारा आनंद पाहणाऱ्यांच्या मनालाही ऊब देणारा ठरला.**



**अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे सुप्रसिद्ध लेखिका मा. मेधाताई देशमुख यांनी भेट दिली.**
**या वेळी पाहुण्यांचे स्वागत करून त्यांना संस्थेच्या दिव्यांग मुलांसाठीच्या शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार व पुनर्वसन उपक्रमांची माहिती देण्यात आली.**



**दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी आर्मी पब्लिक स्कूल, अहिल्यानगर येथील शिक्षक व विद्यार्थ्यांनी अनामप्रेम संस्था, सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे शैक्षणिक भेट दिली.**
**या वेळी संस्थेच्या उपक्रमांची माहिती देऊन संपूर्ण प्रकल्पाची पाहणी करून घेण्यात आली.**
**गौरंग अभिनव शाळेतील शिक्षकांनी अंध व अस्थिव्यंग विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शिक्षणपद्धतीचे थेट प्रात्यक्षिक सादर केले.**
**या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, संवेदनशीलता व समाजसेवेची भावना अधिक दृढ झाली.**
**कार्यक्रमाच्या शेवटी अनामप्रेम संस्थेच्या वतीने सर्वांचे मन:पूर्वक आभार मानण्यात आले.**



Scanned with OKEN Scanner




नुकत्याच पार पडलेल्या “दानोत्सव 4.0” या भव्य कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाच्या प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती स्मिता भारतीयाजी,
Vice President – Finance, ENDRESS & HAUSER (अमेरिकन कंपनी) या मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.
कार्यक्रमादरम्यान श्रीमती भारतीयाजी यांनी DANUTSAV 4.0 च्या संकल्पना, उद्देश व सामाजिक योगदानाविषयी उपस्थितांशी सविस्तर व प्रेरणादायी विचार मांडले. यावेळी त्यांनी अनामप्रेम संस्थेच्या मराठवाडा स्टॉलला आवर्जून भेट देत संस्थेच्या कार्याची, उपक्रमांची व दिव्यांग मुलांसाठी राबवण्यात येणाऱ्या शैक्षणिक व पुनर्वसन कार्याची आत्मीयतेने माहिती घेतली.



अनामप्रेम मराठवाडा प्रकल्पास श्रीमती कांचन देशमुख यांनी आपल्या कन्या व पुतणीसह सदिच्छा भेट दिली. आज त्यांच्या वाढदिवसाच्या मंगल प्रसंगी, त्यांनी मुलांसाठी केक व मिठाई आणून आपला आनंद संस्थेतील मुलांबरोबर साजरा केला.







टाटा इन्स्टिट्यूट, मुंबई येथील विद्यार्थ्यांनी अनामप्रेम, सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे शैक्षणिक भेट दिली.
या वेळी विद्यार्थ्यांनी दिव्यांग मुलांच्या शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार व पुनर्वसनासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती घेतली.
संस्थेच्या कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र व उद्योगभवनाच्या माध्यमातून दिव्यांग युवक-युवतींना आत्मनिर्भर करण्याच्या प्रयत्नांचे विद्यार्थ्यांनी विशेष कौतुक केले.
या भेटीमुळे विद्यार्थ्यांना दिव्यांग जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला व समाजसेवेची जाणीव अधिक दृढ झाली.







Scanned with OKEN Scanner

# “दिव्यांग मुलांसोबत वाढदिवस – संवेदनशीलतेचा सुंदर उत्सव”









अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात श्री. श्रीनिवास रामदास रच्चा यांचा वाढदिवस अत्यंत आपुलकीच्या व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी त्यांनी संस्थेतील दिव्यांग मुलांसोबत आनंदाचे क्षण वाटून घेत स्नेहभोजनाची व्यवस्था केली. त्यांच्या या प्रेमळ व संवेदनशील उपक्रमामुळे मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला, तर संपूर्ण परिसर मानवी संवेदना, कृतज्ञता व सकारात्मक ऊर्जेने भारावून गेला. सामाजिक जाणीव जपणारा हा उपक्रम न्यूजलेटरमध्ये निश्चितच प्रेरणादायी ठरावा असा आहे.

राहुरी येथील कृषी अधिकारी मा. श्री. प्रदीपजी लाटे साहेब यांनी आपल्या परिवारासह दिव्यांग मुलांसोबत अत्यंत आनंदात वाढदिवस साजरा केला.
या प्रसंगी संस्थेची कार्यपद्धती व पुनर्वसन उपक्रमांची माहिती देण्यात आली. गौरांग शाळेतील बालकांच्या गीत सादरीकरणाने कार्यक्रमाची शोभा वाढली.











**प्रकल्पात वाढदिवसानिमित्त मान्यवरांच्या हस्ते अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.**



Scanned with OKEN Scanner

# अनामप्रेम - नोव्हेंबर 25 वसतिगृहनिहाय विद्यार्थी संख्या




हिंमतभवन वसतिगृह

लाभार्थी 65



गौरंग वसतिगृह

लाभार्थी 30



सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प

लाभार्थी 94



यशवंत प्रकल्प आधारग्राम

लाभार्थी 19




अनामप्रेम पुणे वसतिगृह

लाभार्थी 15



मराठवाडा वसतिगृह

लाभार्थी 15

## अनामप्रेम संचलित 6 प्रकल्पातील एकूण लाभार्थी संख्या 238



Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM ACTIVITY



अनामप्रेम संचलित गौरांग अभिनव शाळेमध्ये उत्साहात संविधान दिन साजरा करण्यात आला.
या प्रसंगी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची मूल्ये, हक्क व कर्तव्ये याविषयी सोप्या व समजेल अशा पद्धतीने माहिती देण्यात आली.
लोकशाही, समानता व न्याय या मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात रुजवण्याचा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.
संविधानाच्या विचारांवर घडणारी ही पिढीच उद्याचा सशक्त भारत घडवेल, असा विश्वास या कार्यक्रमातून दृढ झाला.



जागतिक दिव्यांग दिनानिमित्त अनामप्रेम संस्थेत विविध स्पर्धांचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमधून दिव्यांग विद्यार्थ्यांची कौशल्ये, आत्मविश्वास व सृजनशीलता यांचे दर्शन घडले, तर संपूर्ण परिसर आनंद, प्रेरणा व सकारात्मक ऊर्जेने भारावून गेला.



अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग मुलांसाठी हातमपुरा येथील गुरुद्वारात स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.
या प्रसंगी संस्थेतील सर्व विद्यार्थी मोठ्या आनंदाने उपस्थित होते.
गुरुद्वारातील सेवा, समानता व बंधुभावाच्या वातावरणात झालेल्या या स्नेहभोजनामुळे विद्यार्थ्यांना आपुलकी, माणुसकी व एकतेचा अनुभव मिळाला.




अनामप्रेम हिंमत भवन वसतिगृहात नित्यनियमाने अग्निहोत्र केले जात आहे.
या पवित्र उपक्रमामुळे संपूर्ण परिसरात सात्त्विक, शुद्ध व सकारात्मक ऊर्जेचे वातावरण निर्माण होत असून विद्यार्थ्यांच्या मन:शांतीस, आरोग्यास व एकाग्रतेस लाभ होत आहे.
अग्निहोत्राच्या माध्यमातून साधेपणा, शिस्त व आध्यात्मिक मूल्यांची जपणूक होत असून हा उपक्रम संस्थेच्या संस्कारप्रधान कार्याला अधिक बळ देणारा ठरत आहे.



Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM Newsletter







मा. श्री. सागर चौधरी (कार्यकारी अभियंता, जि.प. अहिल्यानगर) यांनी आपल्या परिवारासह अनामप्रेम संस्था – सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे सदिच्छा भेट दिली. या वेळी दिव्यांग मुलांनी स्वतः तयार केलेल्या नॅपकिन बुकेद्वारे त्यांचा सन्मान करण्यात आला. भेटीदरम्यान लिंगतीर्थ–प्रकल्प रस्त्याची पाहणी करून सदर कामाला लवकरच गती देण्याची हमी त्यांनी दिली. संस्थेच्या कार्य, सुविधा व सेवांची त्यांनी मनापासून प्रशंसा केली.










संस्थेतील कार्यकर्ता चेतन लांडगे याची CGL द्वारे Textile Department मध्ये UDC पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्याचा राजमुद्रा अकॅडमी तर्फे श्रीमती पांडुळे मॅडम यांनी सत्कार केला. याप्रसंगी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना अनामप्रेमची माहिती देण्यात आली.



शहरातील व्यापारी महासंघाचे माजी उपाध्यक्ष तसेच प्रदेश तेली महासंघाचे अध्यक्ष असलेले श्री. कचरुजी वेळंजकर साहेब यांची “भारतीय तैलिक साहु राठोड महासभा” या राष्ट्रीय संघटनेच्या राष्ट्रीय संघटन सचिवपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन अनामप्रेम परिवारातर्फे नॅपकिन बुके देऊन सन्मान करण्यात आला

Scanned with OKEN Scanner

# November - Highlights:



ENDRESS & HAUSER कंपनीच्या व्हाइस प्रेसिडेंट (Finance) मा. श्रीमती स्मिता भारतीयाजी यांनी सहकारी श्री अमित श्रीवास्तव व श्री पीरल पटेल यांच्यासह अनामप्रेम संस्थेस सदिच्छा भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी संपूर्ण प्रकल्पाचे अवलोकन करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांच्या गरजांची माहिती घेतली. संस्थेच्या कार्याचा सविस्तर परिचय देताना स्वतःची वास्तू नसल्याने होणाऱ्या अडचणी, विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक स्वतंत्र व्यवस्था व भविष्यातील विस्ताराच्या गरजांवर सखोल चर्चा झाली. या भेटीनंतर अंतर्गत पातळीवर सकारात्मक विचारविनिमय करून पुढील संपर्क ठेवण्याचे आश्वासन त्यांनी दिले. या संवादातून अनामप्रेम परिवाराच्या आशा निश्चितच बळावल्या आहेत.

श्रीयुत रमेश गणेशराव कुलकर्णी यांनी अनामप्रेम संस्थेच्या मराठवाडा प्रकल्पास सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण-प्रशिक्षणाची व स्वावलंबनाच्या दिशेने सुरू असलेल्या कार्याची सविस्तर माहिती घेतली. यावेळी त्यांनी स्वतःचे स्वलिखित पुस्तक, 'कळत न कळत', मुलांना भेट म्हणून देऊन प्रेमळ स्नेह व्यक्त केला. प्रकल्पातील कार्याची त्यांनी मनापासून प्रशंसा करत अनामप्रेमच्या सेवाभावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.






ऑक्टोबर महिन्यात Y4J प्रशिक्षण केंद्रामार्फत एकूण १९ दिव्यांग विद्यार्थ्यांनी आपले प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून त्यांना संस्थेमार्फत खाजगी क्षेत्रात रोजगार मिळाला आहे.

Scanned with OKEN Scanner

# श्रावणी



संघर्षातून यशाकडे – श्रावणीची प्रेरणादायी कहाणी

आज आपण अनामप्रेममध्ये वाढलेल्या एका बालिकेची ओळख करून घेणार आहोत,
जिचे नाव आहे श्रावणी..

माणसांचं आयुष्य आणि झाडांची रचना यात एक प्रकारचे साम्य असते... काही माणसं पानांसारखी अर्ध्यावरच साथ सोडणारी... तर काही असूनही शेवटपर्यंत साथ न देणारी...!

अगदी याच उक्तीप्रमाणे श्रावणीच्या आयुष्याची सुरुवात झाली.

जन्मदात्या आई-वडिलांनीच नुकत्याच जन्मलेल्या श्रावणीचा स्वीकार न करता अवघ्या आठ दिवसांच्या अर्भक अवस्थेत तिला बेवारसपणे रस्त्यावर सोडून दिले.
दिनांक 2 ऑगस्ट 2003 रोजी नाशिक येथील एकलहरे रोडवरील मारुती मंदिराजवळ ही नवजात बालिका सापडली. तेथील पुजाऱ्यांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधला. पोलिसांनी श्रावणीच्या पालकांचा शोध घेण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला अगदी वर्तमानपत्रात देखील जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली.
परंतु, अनेक प्रयत्नांनंतरही तिच्या पालकांचा काहीही मागमूस लागला नाही.

त्यानंतर श्रावणीला आधार आश्रम, नाशिक येथे दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीदरम्यान असे निष्पन्न झाले की श्रावणी ही दोन्ही डोळ्यांनी अंशतः अंध आहे. या कारणामुळे तिचे दत्तक पुनर्वसन होऊ शकले नाही.

शिक्षणाचा संघर्ष
आधार आश्रमात श्रावणीचे बालपण आनंदात गेले. मात्र, पुढील शिक्षणासाठी योग्य संस्थेची आवश्यकता असल्याने तिला प्राथमिक शिक्षणासाठी जागृती अंध विद्यालय, आळंदी (पुणे) येथे दाखल करण्यात आले. तेथे श्रावणीने दहावीपर्यंतचे शिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले.
यानंतर पुढील शिक्षणासाठी तिला बाल शिक्षण मंडळाचे श्रीमती कमलाबाई गाडगीळ बालगृह, संगमनेर येथे पाठवण्यात आले. परंतु, येथे अंध विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची योग्य व्यवस्था नसल्यामुळे पुन्हा एकदा तिच्या शिक्षणात अडथळे निर्माण झाले.
समुद्रातील वादळांपेक्षा मनातील वादळे अधिक भयानक असतात...
शिक्षणाची प्रचंड ओढ, जिद्द, पण मार्ग दिसत नाही त्यामुळे श्रावणी मानसिक दृष्ट्या खचत चालली होती. शिक्षणाकरता तिची तळमळ पाहून तेथील शिक्षकांच्या लक्षात आली. ते तिच्यासाठी योग्य अंधशाळेचा शोध घेऊ लागले.



Scanned with OKEN Scanner

अनामप्रेम संस्थेमध्ये प्रवेश – जीवनाला नवी दिशा
अशातच संगमनेर येथील बालगृहाच्या तत्कालीन मुख्याध्यापकांना अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील अनामप्रेम संस्थेबद्दल माहिती मिळाली. त्यांनी तात्काळ संस्थेच्या प्रमुखांशी दूरध्वनीवर संपर्क साधून श्रावणीला प्रवेश देण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीनुसार त्यांना लगेच अनामप्रेम मध्ये बोलविण्यात आले. श्रावणीच्या जुजबी मुलाखतीनंतर 2 एप्रिल 2019 रोजी श्रावणीचा अनामप्रेम संस्थेमध्ये प्रवेश निश्चित झाला.
संस्थेने केवळ तिची शिक्षणाची जबाबदारीच नव्हे, तर पालकत्वही स्वीकारले.
अनामप्रेम संस्थेच्या तत्कालीन संचालकांनी श्रावणीचा न्यू आर्ट्स कॉलेजमध्ये बारावीचा प्रवेश निश्चित केला आणि तिचे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून घेतले.अंध विद्यार्थ्यांसाठी रायटर, शैक्षणिक सुविधा आणि मार्गदर्शन मिळवणे अत्यंत कठीण असते; मात्र अनामप्रेम संस्थेमुळे श्रावणीला ही सर्व मदत वेळेवर मिळाली.

संस्थेच्या सहवासात श्रावणीने केवळ शिक्षणच नव्हे, तर स्वावलंबन, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव ही आत्मसात केली. ती संस्थेतील इतर कामांमध्ये नेहमी पुढाकार घेऊन मदत करत असे.

यशाची फलश्रुती
महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर श्रावणीने स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला, विविध परीक्षा दिल्या, फॉर्म भरले आणि अखेर तिच्या कठोर परिश्रमांना यश मिळाले.
सप्टेंबर 2024 मध्ये श्रावणीची सांख्यिकी विभागात अन्वेषक पदावर नियुक्ती झाली.
आज ती शासकीय सेवेत कार्यरत आहे – हे तिच्या संघर्षाचे, जिद्दीचे आणि अनामप्रेम संस्थेच्या पाठबळाचे फलित आहे.
समय सबकुछ बदल देता है,
जरूरत सिर्फ सब्र की होती है…!

अनामप्रेम संस्थेविषयी श्रावणीचे मनोगत
श्रावणी सांगते—
देवाचे दर्शन आणि अनामप्रेमचे मार्गदर्शन… या दोन्ही गोष्टींनी माझे जीवन उजळून टाकले आहे…!

माझ्या आयुष्यातील सर्व अडचणींवर मात करण्याची ताकद मला अनामप्रेम संस्थेमुळे मिळाली. आज मी चांगल्या शासकीय पदावर कार्यरत आहे, याचे संपूर्ण श्रेय मी अनामप्रेम संस्थेला देते.
जन्मदात्यांनी मला सोडले, पण अनामप्रेमने मला स्वीकारले – हेच माझे सर्वात मोठे भाग्य आहे. अनामप्रेम संस्था माझ्यासाठी माय-बाप आहे.

माणसाने माणसाशी माणसासारखं वागणं, हाच खरा धर्म आहे…! हेच अनामप्रेम संस्था शिकवते आणि जगते.
वैवाहिक जीवनाची नवी सुरुवात
दिनांक 14 एप्रिल 2025 रोजी श्रावणीचा विवाह ज्ञानेश्वर लक्ष्मण गडाख (रा. रेणुकाई वाडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) यांच्याशी झाला.
ज्ञानेश्वर हे अनामप्रेम संस्थेचे माजी विद्यार्थी असून ते अंशतः अंध आहेत आणि सध्या केंद्र सरकारच्या सेवेत कार्यरत आहेत.

श्रावणी आणि ज्ञानेश्वर – दोघेही शासकीय सेवेत कार्यरत असून, विचारांच्या जडणघडणीतून झालेला हा विवाह दिव्यांग समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे.
एका अनाथ, निराधार आणि दिव्यांग बालिकेचे भविष्य घडविणारी ही कहाणी म्हणजे – अनामप्रेम संस्थेच्या कार्याचा जिवंत साक्षात्कार आहे.

Scanned with OKEN Scanner







**अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग कार्यकर्त्यांनी कोकण विभागातील विविध सामाजिक संस्थांना भेटी देत अनुभवांची देवाणघेवाण केली. या भेटींमधून परस्पर सहकार्य, प्रेरणा आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ झाली.**

---

संस्थेतील दिव्यांग बांधवांच्या कौशल्यातून बनवण्यात आलेल्या दर्जेदार वस्तू

## अनामप्रेम कौशल्य विकासालय अंतर्गत कौशल्य निर्मिती



हवाई चप्पल, क्रॉक्स

दिव्यांग निर्मित उत्पादने खरेदी करुन त्यांना रोजगारक्षम बनवा.

नॅपकिन बुके, सॅनिटरी पॅड

गांधी मैदान, अहिल्यानगर. मो. 7350013805



मुख्य ऑफिस (गांधी मैदान) : 9011004576, 9422054956
सत्यमेव जयते ग्राम (निंबळक) : 7350517778, 7350013805
यशवंत प्रकल्प (इसळक) : 9011918786, 9422307116
कौशल्य विकास केंद्र, निंबळक : 9011918786, 8788548677
पुणे प्रकल्प : 9011750022, 9372404963
छ.संभाजीनगर प्रकल्प : 9011750035, 9921509199

**w ww.anamprem.org**

Scanned with OKEN Scanner



# दिव्यांग हिताय, नित्य समर्पण

अनामप्रेम

- अनामप्रेम, गांधी मैदान, अहिल्यानगर (अहमदनगर) 414001
- सत्यमेव जयते ग्राम, निंबळक, ता. जि.अहिल्यानगर 414111
- पुणे प्रकल्प, सायली सोसायटी, चैतन्यनगर मैदान जवळ, धनकवडी, पुणे-411043.
- छ.संभाजीनगर (औ.बाद) प्रकल्प, सूतगिरणी रोड, गारखेडा परिसर, छ.संभाजीनगर 431009

Email - anampreminfo@gmail.com
www.anamprem.org

Follow us On
facebook.com/anamprem
instagram/anamprem 2005
youtube.com/anamprem

## देणगी देण्याकरीता बँक तपशिल

| | |
|---|---|
| Bank Name | **State Bank Of India** |
| Name Of Account | **ANAMPREM** |
| Branch | **Kalyan road ( SME ), Ahilyanagar (Ahmednagar)** |
| Account No | **32144934687** |
| Account Type | **Current** |
| IFSC Code | **SBIN0014794** |

आपण देणगी ऑनलाईन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन नंबर ही माहिती संस्थेला **anampreminfo@gmail.com** या मेल वर अथवा 9011004576 या संपर्क क्रमांकावर कळवावे.

Scanned with OKEN Scanner